## महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720

फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com


जा.क्रं./ प्रेस नोट/288/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 18/08/2024

# 1)चोरी :-

**1)देगलुर :-** दिनांक 16.08.2024 रोजी 15.20 वा. चे सुमारास, **रामपुर रोड येथील सावित्रीबाई फुले शाळेच्या समोर रोडवर देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीच्या स्वीप्ट डिझायर गाडी क्रं. एम.एच.–26/ए.के.–1167 या गाडीच्या डिक्कीत मध्ये खाजगी कामासाठी ठेवलेले नगदी 14,000,00/–रूपये गाडीचे साईडचे काच फोडुन डिकींचे लॉक काढुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी हणमंत जयवंतराव इंगोले, वय 38 वर्षे, व्यवसाय गुत्तेदार रा. बेरळी बु. ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 394/2024 कलम 305 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.नं. 9130087444** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :-** दिनांक 15.08.2024 रोजी 09.45 वा. चे सुमारास, **रेस्टहाऊसचे बाजुला श्याम किराणा समोर सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हया त्यांच्या स्कुटी क्रं. एम.एच.–26/सी.के.–1139 गाडीवर बसुन श्रीनगर येथील भावाचे दुकाणावरून घरी सोमेशकॉलनी कलामंदीर कडे जात असताना नमुद ठिकाणी आले असता त्यांचा ॲपल कंपनीचा आयफोन 14 प्रो डि पर्पल कलरचा मोबाईल किंमती 50,000/–रूपयाचा फिर्यादीची नजर चुकवून बॅगचे साईडचे पाणीबॉटल ठेवण्याचे कप्पात ठेवलेला कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दिशा हिमतलाल शहा, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. सोमेशकॉलनी कलामंदीर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 332/2024 कलम 303 (3) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/209 मंगनाळे, मो.नं. 8668296883** हे करीत आहेत.

# 2)अवैध रेती चोरी :-

**1)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 17.08.2024 रोजी 14.45 वा. चे सुमारास, **वाजेगाव ते शिकारघाट रोड वरील फतेपुर लालवाडी रोडवर बाळु पंचलिंगे यांचे हॉटेल समोर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विनापरवाना बेकायदेशीर रेतीची चोरी करून शासनाची रॉयल्टी न भरता टाटा टेम्पो 407 क्रं. एम.एच.–14/ए.एस.–8832 किंमती 1,50,000/– मध्ये एक ब्रास रेती किंमती 3000/–रूपयाची चोरटी वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1321 संदिप दिगंबर साळवे, ने. पो.मु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 740/2024 कलम 303(2),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.नं. 9284351496** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 17.08.2024 रोजी 07.15 वा. चे सुमारास, **रविनगर कौठा, सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी विनापरवाना बेकायदेशीर रेतीची चोरी करून शासनाची रॉयल्टी न भरता टाटा टेम्पो 407 क्रं. एम.एच.–28/एच–7944 किंमती 1,50,000/– मध्ये दोन ब्रास रेती किंमती 6000/–रूपयाची चोरटी वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1243 ज्ञानोबा किशनराव कवठेकर, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 739/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 सह कलम 48 (7)(8) महाराष्ट्र जमिन महसुल कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2168 शेख जावेद, मो.नं. 8999978576** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :-

**नांदेड ग्रामीण :-**दिनांक 17.08.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **राज ऑईल मिल समोर ढवळे कॉर्नर, नांदेड येथे,** यातील नमुद फिर्यादी हा आईस्क्रीम विकत असताना अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करून स्प्लेंडर मोटार सायकलवर येवून फिर्यादीस 500/रूपये दे म्हणुन मागणी केली फिर्यादीने माझ्याकडे पैसे नाहित असे म्हणाल्याने फिर्यादीस आरोपीतांनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करून हातातील चाकुने फिर्यादीचे उजव्या हातावर मारून गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गजराज डेबीसींग, वय 32 वर्षे, व्यवसाय आईस्क्रीम गाडा रा. शर्मा कॉलनी लातुर फाटा, नांदेड,** यानी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 741/2024 कलम 118(2),115(2),352,351(2),351(3),3(5) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.नं. 9823827173** हे करीत आहेत.

## 4)भारतीय हत्यार कायदा :–

**1)विमानतळ :–**दिनांक 17.08.2024 रोजी 11.15 वा. सुमारास, **नमस्कार चौक येथे रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी खंजर बाळगून सार्वजनिक ठिकाणी लोकांमध्ये दहशत निर्माण करत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/344 संतोष गंगाधरराव राणे, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 319/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2372 ताटे, मो.क्रं. 9860083917** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :–**दिनांक 17.08.2024 रोजी 00.10 वा. सुमारास, **मौजे नाळेश्वर राजमाता जिजाऊ चौक ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/गुंडेराव रघुनाथ करले, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 111/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री सय्यद, मो.क्रं. 7768727127** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)लोहा :–**दिनांक 17.08.2024 रोजी 15.05 वा. चे सुमारास, **सोनु नागन कांबळे याचे राहते घरी बालाजी नगर, लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या गुडगुडी नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 12,000/–रूपये व जुगाराचे साहित्य 49,000/–रूपयाचे असे एकुण 61,000/रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री विश्वदिप रामचंद्र रोडे, ने. पोस्टे लोहा** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे लोहा** गुरनं 291/2024 कलम 4,5 म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2107 खाडे, मो.नं. 8888865817** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर :–**दिनांक 17.08.2024 रोजी 18.10 वा. चे सुमारास, **सावित्रीबाई फुले नगर, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1380/–रूपये व जुगाराचे साहित्यसह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री अश्रोबा लिंबाजी घाटे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 333/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2155 जमदाडे, मो.नं. 9284401800** हे करीत आहेत.

**3)नांदेड ग्रामीण :–**दिनांक 17.08.2024 रोजी 18.25 वा. चे सुमारास, **माळटेकडी जवळ चिकुच्या मळयात, नांदेड येथे,** यातील नमुद दहा आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 8710/–रूपये व जुगाराचे साहित्यसह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/2907 ज्ञानेश्वर केशव कलंदर, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 742/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2441 मोरे, मो.नं. 8208062971** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)बारड :–**दिनांक 17.08.2024 रोजी 14.26 वा. चे सुमारास, **पांढरवाडी गावासमोरील साई ढाबा ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी किंमती 7210/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/729 मोहम्मद अझरोद्दीन वलीयोद्दीन, ने. पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 79/2024 कलम 65(ई) मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2328 कारंजकर, मो.नं. 9767452207** हे करीत आहेत.

**2)देगलूर :–**दिनांक 17.08.2024 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मौजे शेवाळा आबादी येथे मुख्य रोडवर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी किंमती 3360/–रूपयाचा माल मोटार सायकल क्रं. एम.एच.–26/बीएल–6846 वर चोरटी विक्री करण्याचे उदेशाने घेवून जात असताना ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/142 भारत खंडू फंताडे, ने. पोस्टे देगलूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 396/2024 कलम 65(ई) मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1984 सकनुरे, मो.नं. 9552186602** हे करीत आहेत.

**3)रामतीर्थ :–**दिनांक 17.08.2024 रोजी 17.15 वा. चे सुमारास, **मौजे लोहगाव अण्णाभाऊ साठे नगर आरोपीचे रहाते घरी लोहगाव ता. बिलोली जि.नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शिंदी किंमती 2000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आली. वगैरे **फिर्यादी पोकॉ/180 संजय माधवराव शिंदे, ने. पोस्टे रामतीर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 190/2024 कलम 65(ई) मप्रोका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/शेख कालोजी, मो.नं. 9823206916** हे करीत आहेत.

## 7)पाण्यात बडुन मृत्यु :–

**रामतीर्थ** :–दिनांक 16.08.2024 रोजी 13.00 वा. ते दिनांक 17.08.2024 रोजी 10.30 वा. चे दरम्यान, **चिटमोगरा शिवारातील तळयात ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे शिवाजी मलबा काळेकर, वय 37 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड** हे शेतातील पिकावर फवारणी मारण्यासाठी पिचकारी मध्ये पाणी भरण्यासाठी तळयात जावुन पाणी घेत असतांना त्यांचा पाय घसरून तळयाचे पाण्यात पडल्याने मयतास पोहता येत नसल्याने पाण्यात बुडून मरण पावले. वगैरे **खबर देणार मारोती मलबा काळेकर, वय 55 वर्षे व्यवसाय शेती रा. चिटमोगरा ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे रामतीर्थ आ. मृ. 24/2024** कलम 194 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1371 शिंदे, मो.नं. 9552514548** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड